# नियमित दिवाणी दावा क्र. १८८/२०२३.

यशवंत वि. लक्ष्मण

नि. १८ क्रमशः

**वादी तर्फे साक्षीदार क्र. १ रामभाउ सुकदेव नेटारे यांचा पुढील सरतपास वकिल श्री. बी. एम. ठाकरे यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

मी सदरील प्रकरणात पुराव्याकामी प्रतिज्ञालेख दाखल केला असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो **नि.क्र. १८** लगत आहे. नि. क्रं. ३ सोबत मौजे वाहेगाव साळ येथील गट क्रं. २८९, ३०२, ३९३ चा गाव नमुना सातबारा उताराच्या प्रती दाखल केलेल्या आहेत. त्यांना अनुक्रमे **नि क्रं. २१ ते २३** देण्यात आले. दिनांक ०६/०७/२०२३ रोजीचा रजिस्टर पोस्टाने पाठविलेल्या नोटीसची कार्यालयीन प्रत दाखल केली आहे. त्यावर वकिलांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला **नि. क्रं. २४** देण्यात आला. नि. क्रं. २० सोबत फेरफार नोंद क्रं. १९०७ प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. ती **नि. क्रं. २५** वर आहे.

**सरतपास संपला.**

**प्रतिवादी क्रं. १ ते ४ बिना लेखी जवाब आहे, प्रतिवादी क्रं. ५ ते ८ एकतर्फा आहे, कोणताही अर्ज अभिलेखावर दिलेला नाही, उलटतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2026.01.12 17:49:43 +0530

(एस. एस. छल्लाणी)

दि. १२/०१/२०२६. दिवाणी न्यायाधिश क. स्तर, चांदवड.